रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## दि. ३१ मार्च, १-२ एप्रिल, २०१७

**-: कार्यक्रम अहवाल :-**



दीपप्रज्वलन करताना रवींद्र साठे, डॉ. अशोक मोडक, अरविंद कुलकर्णी

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी मुंबईच्या सावरकर दर्शन प्रतिष्ठानच्या सहकार्याने गेली ९ वर्षे हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम योजत आहे. यंदा या अभ्यासक्रमाचे हे दहावे वर्ष असून हा अभ्यासक्रम दि. ३१ मार्च -२ एप्रिल, २०१७ या कालावधीत प्रबोधिनीच्या उत्तन येथील ज्ञान-नैपुण्य केंद्रात संपन्न झाला.



उद्घाटन सत्रात मार्गदर्शन करतांना डॉ. अशोक मोडक

या अभ्यास क्रमात हिंदुत्वाचा राष्ट्रवाद व राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्याच्या हेतूने विविध विषयांचा अंतर्भाव करण्यात आला होता. हिंदुत्व चळवळीतील युवा कार्यकर्ते, अभ्यासक, तरुण पत्रकार या अभ्यासक्रमात दरवर्षी सहभागी होतात.




सहभागींना मार्गदर्शन करतांना प्रा. म. मो. पेंडसे

यंदाही महाराष्ट्रातील १० जिल्ह्यातून ४३ पुरुष सहभागी या हिंदुत्व अध्यायन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रमात सहभागी झाले होते. मुंबईतील ज्येष्ठ पत्रकार व राष्ट्रवादाचे अभ्यासक अरविंद विठ्ठल कुलकर्णी हे या अभ्यासक्रमाचे संचालक होते. ज्येष्ठ विचारवंत व राष्ट्रीय प्राध्यापक डॉ. अशोक मोडक यांच्या मार्गदर्शनाने या अभ्याक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

राष्ट्रवादाच्या जागतिक स्तरावरील परिभाषेचा अभ्यास करताना, भारतीय राष्ट्रवादाच्या मुळाशी असलेल्या व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्टीच्या एकात्म समग्र व्याख्या समजून घ्या, असे डॉ. मोडक यांनी सहभागींना संबोधून म्हटले. या उद्घाटन प्रसंगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी आपल्या प्रास्ताविकात या अभ्यासक्रमाच्या आयोजना मागची नेमकी भूमिका काय आहे, ती सहभागींना समजावून सांगितली.



सहभागींना मार्गदर्शन करतांना डॉ. अविनाश कोल्हे

गेल्या काही वर्षापासून हिंदुत्वाची चर्चा मोठ्या प्रमाणात घडताना दिसते. मात्र या हिंदुत्वाच्या चर्चेत काही अपवाद वगळता दोन्ही बाजूने बोलणारे पुरेसा अभ्यास करुन प्रकट होताना दिसत नाहीत. त्याही पुढे जाऊन भारतीय राष्ट्रवादाच्या अनुषंगाने हिंदुत्वाचा अभ्यास करण्यासाठी कोणकोणत्या विषयांचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. अशा विषयांची तोंड ओळख करुन देण्याच्या हेतूने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.




सहभागींना मार्गदर्शन करतांना ॲड. किशोर जावळे



सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. भाऊ तोरसेकर

राष्ट्रवादाची संकल्पना युरोप खंडात कशाप्रकारे उदयास आली व त्याची मागील ५०० वर्षात कशी वाटचाल होत गेली या विषयाच्या सत्राने अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. विविध राष्ट्रांच्या राष्ट्रवादाचे भाष्यकार व या संकल्पनेसाठी अथक प्रयत्न करणारे रिशेल्यू, तालेराँ, काव्हूर, बिस्मार्क, कोसूथ, जेफरसन, केमाल या सात निधर्मी राष्ट्रवादाच्या शिल्पकारांची ओळख या अभ्यासक्रमात करुन देण्यात आली. प्रा. म. मो. पेंडसे व प्रा. अविनाश कोल्हे यांनी या दोन सत्रांना मार्गदर्शन केले.

भारतामध्ये मुस्लिम, ख्रिस्ती आणि कम्युनिस्ट विचारधारेची स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिका नेमकी काय आहे. याची अनुक्रमे तीन सत्रांतून मांडणी करण्यात आली. त्या तीन सत्रांना ज्येष्ठ विधीज्ञ किशोर जावळे, अरविंद कुलकर्णी आणि भाऊ तोरसेकर यांनी अभ्यासपूर्ण सखोल मार्गदर्शन केले.




सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. अरविंद कुलकर्णी



सहभागींना मार्गदर्शन करतांना डॉ. श्रीरंग गोडबोले

भारतीय राष्ट्रवादाची मांडणी करताना स्वातंत्र्यपूर्व काळात उदयास आलेल्या हिंदी राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे हिंदुत्वाकडे कायम दुय्यम दर्जाने पाहण्यात आले. त्यामुळे या विषयाचे अध्ययन होणे व ते समजून घेणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाचे संचालक अरविंद कुलकर्णी यांनी 'हिंदी राष्ट्रवाद' या विषयावरील सत्राची मांडणी केली.



सहभागींना मार्गदर्शन करतांना डॉ. मनिषा टिकेकर

हिंदुत्वाचा अभ्यास करताना 'लोकजीवनातील हिंदुत्व' अभ्यासणे गरजेचे आहे. देशभरातील सामान्यांचे जगणे त्यातून हिंदुत्व सामान्य जीवनात कसे रुजले आहे, याचा प्रत्यय घडवणारे सत्र डॉ. सुवर्णा रावळ यांनी साकारले. हिंदुत्व आणि राष्ट्रवाद या बाबतची रा. स्व. संघ आणि सावरकरांची भूमिका दोन स्वतंत्र सत्रांतून विषद करण्यात आली. या सत्रांना अनुक्रमे रतन शारदा आणि डॉ. श्रीरंग गोडबोले यांनी मार्गदर्शन केले.

भारतीय उपखंडातील पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका या देशांचा राष्ट्रवाद व त्यांची आजची स्थिती या विषयावर माहितीपूर्ण मार्गदर्शन डॉ. मनिषा टिकेकर यांनी केले.




सहभागींना मार्गदर्शन करतांना श्री. भिकुजी (दादा) इदाते

तीन दिवस चालणाऱ्या या अभ्यासक्रमात सहभागी झालेल्यांची परीक्षा घेण्यात आली. या अभ्यासक्रमाचा समारोप रा. स्व. संघाचे ज्येष्ठ विचारवंत व सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष भिकुजी (दादा) इदाते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. वर्तमान स्थितीत राष्ट्रवादापुढील कोणत्या आव्हानांना पेलत आपल्याला सामोरे जायचे आहे याचे दादांनी सहभागींना अनुभवसंपन्न मार्गदर्शन केले. या वेळी सहभागींना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.





सहभागींना प्रमाणपत्र देतांना श्री. भिकुजी (दादा) इदाते



प्रशिक्षण शिबिरात उपस्थित सहभागी